# सहसंचालक,, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

**दुरध्वनी क्र.** 0712-2557266/46 **कार्यासन दु. क्र.** 0712-2557266

**E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in** **Website: rdtenagpur.org.in**

**क्र.तशिस/प्राकाना/शैवि-1/DBT/2018/** 3087

**दिनांक:-** 18 SEP 2018

प्रति,

प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय, शासकीय अनुदानित व विना अनुदानित पदवी, पदव्युत्तर पदवी व पदवीका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय:- राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या 150 व्या जयंती निमित्य आराखडा तयार करण्याबाबत.
संदर्भ:- तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. 16/गांधी जयंती 150/2018/561,
दि. 17/09/2018

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, मा. केंद्रीय मानव संसाधन विकास मंत्री यांनी दि. 7/9/2018 रोजी घेतलेल्या बैठकीत महात्मा गांधी यांच्या 150 व्या जयंती निमित्य वर्षाभराच्या कार्यक्रम करण्याच्या आयोजित केलयच्या दृष्टीने कार्यवाही करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत.

त्यानुसार संदर्भिय परिपत्रकात दिलेल्या कार्यक्रमांची अमलबजावणी करण्यात यावी व त्याबाबतचा प्रत्येक कार्यक्रमाचा तपशिल छायाचित्र, व्हीडीओ सोबत दैनंदिन अहवाल रोज सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत या कार्यालयास सादर करावा.

सदरहू उपक्रमाची काटेकोरपणे अमलबजावणी करण्याबाबत व त्याबाबतचा अहवाल या कार्यालयाकडे दैनंदिन सादर करण्याबाबत कुठलीही दिरंगाई होणार नाही याबाबत प्राचार्य यांनी जातीने लक्ष घालावे.

सहपत्र:- संदर्भिय परिपत्रक

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण वि.का., नागपूर

प्रत:- मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई (का.क्र.१६) यांना माहितीकरीता सविनय सादर.

C:\Meshram Degree\Letters\Letter to All Institute.doc

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

**३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.**

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

तार - EDUTECH E-mail : desk16.dte@gmail.com Internet :http/www.dte.org.in


**परीपत्रक** क्र.:१६/गांधी जयंती'१५०/२०१८/५६१

दिनांक : 17 SEP 2018

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय,

मुंबई / पुणे / नाशिक / अमरावती / औरंगाबाद / नागपूर.

विषयः-राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्त आराखडा तयार करण्याबाबत...

संदर्भः- शासन परीपत्रक उ.वतं.शि.विभाग क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.४३/समन्वय, दिनांक १४/९/२०१८

उपरोक्त विषयासंदर्भात माननीय केंद्रीय मानव संसाधन विकास मंत्री यांनी दिनांक ७/९/२०१८ रोजी घेतलेल्या बैठकीमध्ये महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्त वर्षभराचा कार्यक्रम आयोजित करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. तसेच संचालक, तंत्रशिक्षण व संचालक, उच्च शिक्षण यांना संपूर्ण कार्यवाहीवर देखरेख व नियंत्रण ठेवण्यासाठी नियुक्त केलेले आहे.

तरी आपण आपल्या अधिपत्त्याखालील संस्थांमध्ये खाली देण्यात आलेल्या कार्यक्रमांची अंमलबजावणी करावी. व त्याबाबत विनाविलंब संपूर्ण तपशीलासह संचालक, तंत्रशिक्षण यांना अवगत करावे.

१) महात्मा गांधी यांच्या जीवनावर आधारीत सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी राज्यस्तर व राष्ट्रीयस्तरावर नाटकांचे रंगमंचावरील कार्यक्रम, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आयोजित कराव्यात.

२) स्वच्छता अभियानांतर्गत कार्यक्रम सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी आयोजित करावेत.

३) श्रमदानाचे कार्यक्रम सर्व विद्यापीठे, महाविद्यालय तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी आयोजित करावेत.

४) मानव संसाधन विकास विभागाने, महाराष्ट्राशी ज्या दुस-या राज्याची जोड ठरवून दिलेली आहे, त्या राज्याशी संपर्क करुन विद्यार्थ्यांची देवाण घेवाण कार्यक्रम राबविणे.

५) सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी महात्मा गांधी यांच्या जीवनावर विद्यार्थ्यांचे गीत गायनाचे / भजन गायनाचे कार्यक्रम आयोजित करावेत.

६) सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी या कालावधीत एक खेडे दत्तक घेऊन तेथील सामाजिक केंद्रांमध्ये स्वच्छता अभियान व स्वच्छ भारत अभियान यांची माहिती देऊन तो उपक्रम राबवावा.

७) महात्मा गांधींचा त्यांच्या जीवन कालावधीत महाराष्ट्रातील ज्या स्थळांशी संपर्क आला उदा. वर्धा, पवनार, पुणे, मुंबई इत्यादी ठिकाणी पदयात्रा आयोजित करुन जनजागृती करावी.

८) सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी महात्मा गांधींच्या विचारांवर आधारीत वक्तृत्व स्पर्धा आयोजित कराव्यात. या विषयावर राज्यस्तर व राष्ट्रीय स्तरावर प्रसिध्द व्यक्तींना भाषणे देण्यासाठी आमंत्रित करावे.

९) सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी विद्यार्थ्यांकडून सार्वजनिक ठिकाणी महात्मा गांधींच्या विचारांचे भित्तीचित्रे तयार करुन घ्यावीत व त्यांचे मोठ्या प्रमाणात प्रदर्शन करावे.

१०) सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी त्यांच्या वाचनालयांमध्ये महात्मा गांधींच्या जीवनावरील विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय लेखकांनी लिहिलेली पुस्तके मोठ्या प्रमाणात विद्यार्थी वाचकांसाठी उपलब्ध करुन द्यावीत. तसेच गुजरात,राजस्थान, बिहार इ.राज्यांनी महात्मा गांधीच्या विचारावर आधारीत काही पुस्तके प्रसिध्द केली आहेत, ती सुध्दा त्यांच्या वाचनालयात उपलब्ध करुन देण्यात यावीत.

११) सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी महात्मा गांधींचे सामाजिक कार्य व विचारांचा सर्व राज्यात प्रचार व प्रसार करण्याच्या दृष्टीने वार्षिक दिनदर्शिका तयार करावी व त्यानुसार तात्काळ कार्यवाही करावी.

१२) बिहार शासनाने महात्मा गांधींच्या जीवनावर प्रसिध्द केलेल्या बापू की कहानीया पुस्तकाचे मराठीत भाषांतर करवून घेऊन ते पुस्तक सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी त्यांच्या वाचनालयांमध्ये उपलब्ध करुन देणे संदर्भात तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

१३) सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी महात्मा गांधींच्या भजनांच्या गायनाचे कार्यक्रम या कालावधीत प्राधान्याने आयोजित करावेत.

१४) सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी त्यांच्या सर्व विद्यार्थ्यांच्या रॅली / पदयात्रा वेळोवेळी आयोजित कराव्या व त्यात सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग अनिवार्य करावा.

तरी सदर कार्यक्रमांबाबत आपण स्वतः जातीने लक्ष घालून कार्यक्रम राबवावेत व प्रत्येक कार्यक्रमाचा तपशील छायाचित्र, व्हीडीओ यांना आपल्या स्तरावर योग्य ती प्रसिध्दी देण्यात यावी व याबाबतचा दैनंदिन अहवाल न चुकता श्रीमती सुचित्रा रणदिवे, सहा. संचालक व समन्वयक यांचेमार्फत संचालकांना आवश्यक त्या तपशीलासह सादर करण्यात यावा.

( डॉ. अभय वाघ )
संचालक,तंत्रशिक्षण,म.रा.,मुंबई

प्रत:-१) मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना माहितीसाठी सादर

२) श्रीमती सुचित्रा ग. रणदिवे, सहा.संचालक व समन्वयक, यांना कळविण्यात येते कि, उपरोक्त कार्यक्रमाचा दैनंदिन अहवाल शासनास अद्ययावत माहितीसह कळविण्याची जबाबदारी आपली राहील. विभागिय कार्यालयांकडून प्राप्त अहवाल न चुकता शासनास दैनंदिनरीत्या सादर करण्यात यावा.